# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com** **Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १५/०३/२०२०

आपत्ती प्राधान्य

(ई-मेलने/टपालाने)

**वाचा:-** १. सामान्य प्रशास विभाग निर्णय क्र.२०१६/प्रक्र६२/१८(र.व.का) दिनांक २४ फेब्रुवारी २०२०.

## परिपत्रक

प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहण्यासाठी व त्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जालना जिल्हयातील सर्व शासकीय विभागात आधार बेस्ट बायोमेट्रीक (Aadhaar Enable Bio-metric Attendance System (AE-BAS) उपस्थिती नोंदणी पध्दत संबंधीत विभाग प्रमुखांमार्फत लागू करण्यात आली आहे.

तथापी महाराष्ट्र राज्य तसेच भारतासह संपूर्ण जगात सध्या करोना विषाणु या संसर्गजन्य रोगाची साथ पसरत आहे. त्यामुळे आरोग्य विषयक गंभीर परिणाम, तसेच मोठया प्रमाणावर जिवीत हानी होत आहे. करोना विषाणुची बाधा होऊ नये या पार्श्वभूमीवर जिल्हयातील सर्व शासकीय विभागातील अधिकारी – कर्मचारी यांच्या आरोग्यविषयक बाब विचारात घेता, करोना विषाणुचा प्रसार कार्यालयामध्ये होऊ नये, यास्तव प्रतिबंधात्मक / खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालयातील आधार बेस्ट बायोमेट्रीक (Aadhaar Enable Bio-metric Attendance System (AE-BAS) वापर करण्यात येऊ नये. तसेच आजपासून आधार बेस्ट बायोमेट्रीक (Aadhaar Enable Bio-metric Attendance System (AE-BAS) उपस्थितीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.२०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व.का.) दि.२४ फेब्रुवारी २०२० अन्वये राज्य शासकीय कार्यालयांसाठी ठरवून दिलेल्या वेळेप्रमाणेच कार्यालयात उपस्थितीची नोंद कार्यालय प्रमुखांनी पुर्वी प्रमाणेच उपस्थिती पटांवर नोंदविण्याची व्यवस्था करावी.

Raut

**(रविंद्र बिनवडे)**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**

**जालना**

**प्रतिलिपी:**

सर्व कार्यालय प्रमुख जिल्हा जालना यांना देऊन सूचित करण्यात येते की, सदरची बाब आपले अधिनस्त सर्व अधिकारी – कर्मचारी यांचे निदर्शनास तात्काळ आणून द्यावी.